महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत, तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,मुंबई ४०० ०१९
email : managerpom@mahadiscom.in website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१ फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासंवि/रवका/न.क्र. ३९४/**२९६३७** दिनांक : **०६.१२.२०२१**

**प्रति,**
१) मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या., परिमंडळ कार्यालय (सर्व).
२) मुख्य अभियंता (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या., नाशिक.
३) मुख्य अभियंता (स्थापत्य) म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.

**विषय:- महाराष्ट्र राजभाषा (सुधारणा) अधिनियम, - २०२१ ची अंमलबजावणी करण्यासाठी "मराठी भाषा अधिकाऱ्यांची" नियुक्ती करण्याबाबत.**

**संदर्भ:** - महाराष्ट्र शासन, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग यांचे पत्र क्र. संकिर्ण- २०२१/प्र.क्र.३२२/ऊर्जा-२ दि. २२.१०.२०२१

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने संदर्भीत शासन पत्रान्वये महाराष्ट्र राज्यात शासकीय व निमशासकीय कार्यालया अंतर्गत महाराष्ट्र राजभाषा (सुधारणा) अधिनियम, - २०२१ ची अंमलबजावणी करण्यासाठी **"मराठी भाषा अधिकाऱ्यांची"** नियुक्ती करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

२. सबब, सक्षम प्राधिकारी यांनी मंजुरी प्रदान केल्यानुसार, महावितरण कंपनीतील **"मराठी भाषा अधिकारी"** म्हणुन क्षेत्रिय कार्यालयांसाठी परिमंडळातील मुख्य अभियंता यांनी मानव संसाधना मधील राज्य स्तरीय सेवा जेष्ठते मधील अधिकारी अथवा अन्य अधिकारी **"मराठी भाषा अधिकारी"** म्हणुन नामनिर्देशित करतील. नामनिर्देशित **"मराठी भाषा अधिकारी"** यांनी कार्यालया अंतर्गत होणारा पत्र व्यवहार मराठी भाषेतुन होतो किंवा नाही याचा त्रैमासिक अहवाल सांघिक कार्यालयांस सक्षम अधिकारी यांच्या स्वाक्षरी निहाय सादर करावा. परिमंडळातील मुख्य अभियंता यांना निर्देशित करण्यात येते की, शासन पत्र दि. २२.१०.२०२१ नुसार आपल्या स्तरावरुन योग्यती कार्यवाही करावी.

**सोबत :-** शासन पत्र दि. २२.१०.२०२१

(अ.म. खंदीकर)
**कार्यकारी संचालक (मासं)**

**प्रत सविनय सादर :-**
१) संचालक (मासं) म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.
२) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय औरंगाबाद/ कल्याण.

**प्रत सस्नेह रवाना :-**
१) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/ नागपूर.
२) अवर सचिव (ऊर्जा-२), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ४०० ००१.

**प्रत माहितीसाठी रवाना:-**
महाव्यवस्थापक (मासं), म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.

*C:\Users\admin\Downloads\Marathi Bhasha Adhikari Niyukti Letter.docx*

सत्यमेव जयते

## महाराष्ट्र शासन

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
मंत्रालय (मुख्य इमारत), तिसरा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई-४०० ०३२.

दूरध्वनी क्र.०२२ २२८२७३५
Email ID : rajiv.ambikar@nic.in

क्रमांक : संकीर्ण-२०२१/प्र.क्र.३२२/ऊर्जा-२ दिनांक : २२ ऑक्टोबर, २०२१

**प्रति,**

**सचिव,** महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३ वा मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर क्र. १, कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४०० ००५.

**व्यवस्थापकीय संचालक,**
महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनी मर्या., हाँगकाँग बँक इमारत, ४ था मजला, महात्मा गांधी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

**अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक,**
महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्या., प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१

**अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक,**
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्या., प्रकाशगंगा, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

अध्यक्ष व **व्यवस्थापकीय संचालक,**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.,प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१

**महासंचालक,** महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण, औंध रोड,स्पायसर कॉलेज समोर, पंशुसंवर्धन आयुक्तालया शेजारी, औंध जि. पुणे- ४११ ००७

**मुख्य विद्युत निरीक्षक,**
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, तिसरा मजला, प्रशासकीय इमारत, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर (पूर्व), मुंबई- ४०० ०७१.

**विषय :-** महाराष्ट्र राजभाषा (सुधारणा) अधिनियम, २०२१ ची अंमलबजावणी करण्यासाठी “मराठी भाषा अधिकाऱ्यांची” नियुक्ती करण्याबाबत.

**महोदय,**

उपरोक्त विषयाबाबत उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या प्रशा-३ कार्यासनाच्या दि. २१.१०.२०२१ च्या पत्राची सहपत्रासह प्रत सोबत जोडली आहे.

२. सदर पत्रासोबत असलेल्या श्री. भूषण गगराणी, प्रधान सचिव यांच्या अ.शा. पत्रात नमुद केल्याप्रमाणे आपल्या कार्यालयामध्ये“मराठी भाषा अधिकाऱ्यांची” नियुक्ती करण्याबाबत कार्यवाही करावी ही विनंती.

सहपत्रे:- वरीलप्रमाणे

आपला विश्वासू

( राजीव मा.आंबीकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र शासन
दूरध्वनी क्र २२८१०३९४ : उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
ईमेल- : do३.ield-mh@gov.in मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई –४०० ०३२.

**क्रमांक** : आयएलई-२०२१/प्र.क्र.२७८/प्रशासन ३ दिनांक : २१ ऑक्टोबर, २०२१.

प्रति,

कक्ष अधिकारी(उद्योग-६/ऊर्जा-२)
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

विषय : महाराष्ट्र राजभाषा (सुधारणा) अधिनियम, २०२१ ची अंमलबजावणी करण्यासाठी "मराठी भाषा अधिकाऱ्यांची" नियुक्ती करण्याबाबत---

संदर्भ : मराठी भाषा विभागाचे अ.शा.पत्र क्र मभावा २०२१/प्र.क्र.७२/भाषा-२, दि.०७/१०/२०२१ चे पत्र.

उपरोक्त विषयावरील संदर्भाधीन दि.०७.१०.२०२१ च्या पत्राच्या अनुषंगाने महाराष्ट्र राजभाषा (सुधारणा) अधिनियम,२०२१, दि.१६.०७.२०२१ मधील नियम ५ब(१) येथील तरतूदीनुसार आपल्या अधिनस्त क्षेत्रिय कार्यालयांना **"मराठी भाषा अधिकारी"** नियुक्त करण्याची कार्यवाही करण्याच्या सूचना आपल्या स्तरावरुन देण्यात याव्यात, ही विनंती. सुलभ संदर्भासाठी संदर्भाधीन पत्राची प्रत व महाराष्ट्र राजभाषा (सुधारणा) अधिनियम, २०२१,दि.१६.०७.२०२१ ची प्रत सोबत जोडून पाठवित आहे.

अकादेसाई

सोबत : वरीलप्रमाणे

(अक्षता का.देसाई)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत- प्रशासन-३ कार्यासन संग्रहार्थ.

भूषण गगराणी
प्रधान सचिव

महोदय,

महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ नुसार मंत्रालयीन विभाग व त्यांच्या नियंत्रणाखाली विभागीय व राज्य शासनाची सर्व कार्यालये यांच्यामार्फत वर्जित प्रयोजने वगळता सर्व सामान्य जनतेशी करण्यात येणारा सर्व पत्रव्यवहार व इतर कार्यालयीन कामकाज मराठी भाषेत करणे अनिवार्य आहे. सदर अधिनियमामध्ये सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्र राजभाषा (सुधारणा) अधिनियम, २०२१ दि.१६.०७.२०२१ अन्वये महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आला आहे. सदर अधिनियमामध्ये पुढील तरतुदींचा समावेश करण्यात आला आहे.

- शासकीय प्रयोजने स्पष्ट करण्यात आलेली आहेत,
- राज्य शासनाचे प्रत्येक कार्यालय जनसंवाद व जनहित यांच्यासंबंधीत त्यांच्या धोरणामध्ये मराठीचा वापर करण्यासाठी यथोचित तरतूद करेल,
- मराठी भाषा अधिकारी प्रत्येक कार्यालयात नेमण्यात येईल,
- सर्व कार्यालये त्यांच्या संकेतस्थळावर किंवा संदेशवहनाच्या कोणत्याही साधनांवर मराठी भाषेच्या वापराबाबत स्वयंप्रेरणेने प्रकटीकरण करतील,
- सदर अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी न करणाऱ्या कर्मचाऱ्यांविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्याची तरतूददेखील अधिनियमात करण्यात आलेली आहे.

२. या शिवाय अधिनियमाच्या तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आणि मराठी भाषेच्या वापरासंदर्भात शिफारशी करण्यासाठी सदर अधिनियमान्वये राज्यस्तरावर मा.मंत्री (मराठी भाषा) यांच्या अध्यक्षतेखाली एक राज्य मराठी भाषा समिती स्थापन करण्यात आलेली आहे. तसेच प्रशासकीय कामकाजात मराठीचा वापर न करण्यासंदर्भात प्राप्त होणाऱ्या तक्रारींची चौकशी करुन तक्रारींचे निवारण करण्यासाठी व मराठी भाषेसंदर्भातील उपक्रम राबविण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा मराठी भाषा समिती स्थापन करण्यात येणार आहे.

३. महाराष्ट्र राजभाषा (सुधारणा) अधिनियम, २०२१ ची प्रत सोबत जोडली आहे. शासकीय कामकाजातील मराठीच्या वापराबाबत विधानमंडळाच्या अधिवेशनामध्ये वारंवार प्रश्न, सूचना, चर्चा उपस्थित केल्या जातात. जनसामान्यांकडून आपले सरकार तक्रार प्रणाली, माहितीचे अधिकार

महोदय,

महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ नुसार मंत्रालयीन विभाग व त्यांच्या नियंत्रणाखालील विभागीय व राज्य शासनाची सर्व कार्यालये यांच्यामार्फत "वर्जित प्रयोजने" वगळता सर्व सामान्य जनतेशी करण्यात येणारा सर्व पत्रव्यवहार व इतर कार्यालयीन कामकाज मराठी भाषेत करणे अनिवार्य आहे. सदर अधिनियमामध्ये सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्र राजभाषा (सुधारणा) अधिनियम, २०२१ दि.१६.०७.२०२१ अन्वये महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आला आहे. सदर अधिनियमामध्ये पुढील तरतुदींचा समावेश करण्यात आला आहे.

- शासकीय प्रयोजने स्पष्ट करण्यात आलेली आहेत,
- राज्य शासनाचे प्रत्येक कार्यालय जनसंवाद व जनहित यांच्यासंबंधीत त्यांच्या धोरणामध्ये मराठीचा वापर करण्यासाठी यथोचित तरतूद करेल,
- मराठी भाषा अधिकारी प्रत्येक कार्यालयात नेमण्यात येईल ,
- सर्व कार्यालये त्यांच्या संकेतस्थळावर किंवा संदेशवहनाच्या कोणत्याही साधनांवर मराठी भाषेच्या वापराबाबत स्वयंप्रेरणेने प्रकटीकरण करतील,
- सदर अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी न करणाऱ्या कर्मचाऱ्यांविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्याची तरतूददेखील अधिनियमात करण्यात आलेली आहे .

२. या शिवाय अधिनियमाच्या तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आणि मराठी भाषेच्या वापरासंदर्भात शिफारशी करण्यासाठी सदर अधिनियमान्वये राज्यस्तरावर मा.मंत्री (मराठी भाषा ) यांच्या अध्यक्षतेखाली एक राज्य मराठी भाषा समिती स्थापन करण्यात आलेली आहे. तसेच प्रशासकीय कामकाजात मराठीचा वापर न करण्यासंदर्भात प्राप्त होणाऱ्या तक्रारींची चौकशी करुन तक्रारींचे निवारण करण्यासाठी व मराठी भाषेसंदर्भातील उपक्रम राबविण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा मराठी भाषा समिती स्थापन करण्यात येणार आहे.

३. महाराष्ट्र राजभाषा (सुधारणा) अधिनियम, २०२१ ची प्रत सोबत जोडली आहे. शासकीय कामकाजातील मराठीच्या वापराबाबत विधानमंडळाच्या अधिवेशनामध्ये वारंवार प्रश्न, सूचना, चर्चा उपस्थित केल्या जातात. जनसामान्यांकडून आपले सरकार तक्रार प्रणाली, माहितीचे अधिकार इत्यादी माध्यमातून प्रशासकीय कामकाजातील मराठी भाषेच्या वापरासंदर्भात तक्रारी संपूर्ण महाराष्ट्र राज्यातून प्राप्त होत आहेत. सदर तक्रारींचे निवारण करण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र राजभाषा (सुधारणा) अधिनियम, २०२१ ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आपल्या विभागाच्या दुय्यम आणि प्रशासकीय नियंत्रणाखालील कार्यालयांना उपरोक्त नमूद बाबींसंदर्भात कार्यवाही करण्याचे निदेश सदर अधिनियमातील कलम ५ह नुसार द्यावेत, अशी विनंती करण्यात येत आहे.

आपला,

(सुभाष देसाई)

प्रति,

१) श्री.अजित पवार,
उप मुख्यमंत्री,
वित्त,नियोजन, राज्य उत्पादन शुल्क,
मंत्रालय, मुंबई-४०००३२

२) श्री.अशोक चव्हाण,
मंत्री,
सार्वजनिक बांधकाम
(सार्वजनिक उपक्रम वगळून),
मंत्रालय,मुंबई-४०००३२

३) श्री.छगन भुजबळ,
मंत्री,
अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण,
मंत्रालय,मुंबई-४०००३२

४) श्री.दिलीप वळसे-पाटील,
मंत्री,
गृह, मंत्रालय,मुंबई-४०००३२

५) श्री.जयंत पाटील,
मंत्री,
जलसंपदा व लाभक्षेत्र विकास,
मंत्रालय,मुंबई-४०००३२

६) श्री.बाळासाहेब थोरात,
मंत्री,
महसुल, मंत्रालय,मुंबई-४०००३२

७) डॉ.राजेंद्र शिंगणे,
मंत्री,
अन्न व औषध प्रशासन,
मंत्रालय,मुंबई-४०००३२

८) श्री.राजेश टोपे,
मंत्री,
सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण,
मंत्रालय,मुंबई-४०००३२

लिपिक
मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) यांचे कार्यालय
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

(लिपिक)
मंत्री, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास यांचे कार्यालय
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

लिपिक
मंत्री, महसूल यांचे कार्यालय
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

अ.शा.पत्र क्र. ममावा-२०२१/प्र.क्र. ७२/भाषा-२

मराठी भाषा विभाग
मादाम कामा रोड
हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

मिलींद भ. गवादे
सह सचिव (भा.प्र.से.)

दिनांक : ०७/१०/२०२१

महोदय

महाराष्ट्र राजभाषा (सुधारणा) अधिनियम, २०२१, दि.१६.०७.२०२१ मधील नियम ५ब(१) येथे, "मराठी भाषेचा वापर न करण्यासंदर्भात प्राप्त होणाऱ्या तक्रारींची चौकशी करुन तक्रारींचे निवारण करण्यासाठी व या अधिनियमाच्या तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्य शासनाचे प्रत्येक कार्यालय, सुयोग्य अधिकाऱ्यास "मराठी भाषा अधिकारी" पदनिर्देशित करेल. " अशी तरतूद आहे. त्यानुसार प्रत्येक विभागाने व त्या अतंर्गत कार्यालयाने मराठी भाषा अधिकारी पदनिर्देशित करण्याची कार्यवाही करावयाची आहे.

त्यानुसार सर्व मंत्रालयीन विभागांना "मराठी भाषा अधिकारी" नियुक्त करण्याची कार्यवाही करण्याच्या सूचना मा.मंत्री (मराठी भाषा) व प्रधान सचिव (मराठी भाषा) यांच्या स्तरावर समक्रमांकाच्या दि.०३.०८.२०२१ व दि.०४.०८.२०२१ च्या अ.शा. पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत. तसेच, सदर कार्यवाही करण्यासाठी प्रस्तुत अधिनियमातील कलम ५ह नुसार आपल्या अखत्यारीतील कार्यालयांना सूचना देण्याबाबत विनंतीदेखील सदर अ.शा. पत्रान्वये आपणास करण्यात आली आहे.

तरीसुध्दा अद्याप आपल्या विभागामध्ये किंवा विभागांतर्गत कार्यालयांमध्ये "मराठी भाषा अधिकारी" नियुक्त करण्यात आल्याचे दिसून येत नाही. दि.१५ ऑक्टोबर, २०२१ पर्यंत विधानमंडळातील मराठी भाषा समितीला यासंदर्भात अहवाल सादर करावयाचा आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी आपण व्यक्तीशः लक्ष देऊन आपल्या विभागात "मराठी भाषा अधिकारी" पदनिर्देशित करुन विहित नमून्यात या विभागास माहिती द्यावी, तसेच विभागांतर्गत कार्यालयांना यासंदर्भात आवश्यक त्या सूचना द्याव्यात, ही विनंती.

आपला,

(मिलींद भ. गवादे)

प्रति,
डॉ.श्री.ल.पुंडकुलवार,
उप सचिव,
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.

RNI No. MAHBIL /2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ७, अंक ८(६)] शुक्रवार, जुलै १६, २०२१/आषाढ २५, शके १९४३ [पृष्ठे ६, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक १५**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २०२१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४.—** महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम. .. .. .. .. .. | १-६ |

दिनांक १५ जुलै २०२१ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**सतीश वाघोले,**
प्रभारी सचिव (विधि विधान),
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

**सन २०२१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४.**

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर **"महाराष्ट्र शासन राजपत्रात"** दिनांक १६ जुलै २०२१ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

१९६५ चा महा. ५. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या बाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र राजभाषा (सुधारणा) अधिनियम, २०२१, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम २ मधील,— १९६५ चा महा. ५.

(क) खंड (ब) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(ब-१) "जिल्हा मराठी भाषा समिती" याचा अर्थ, कलम ५ड अन्वये प्रत्येक जिल्ह्यामध्ये घटित केलेली जिल्हा मराठी भाषा समिती, असा आहे ;";

(ख) खंड (क) नंतर, पुढील खंड जादा दाखल करण्यात येतील :—

"(ड) "मराठी भाषा अधिकारी" याचा अर्थ, कलम ५ब च्या पोट-कलम (१) अन्वये मराठी भाषा अधिकारी म्हणून पदनिर्देशित केलेला अधिकारी, असा आहे ;

(ई) "विहित" याचा अर्थ, नियमांद्वारे विहित, असा आहे ;

(फ) "राज्य शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(ग) "राज्य मराठी भाषा समिती" याचा अर्थ, कलम ५क अन्वये घटित केलेली राज्य मराठी भाषा समिती, असा आहे.".

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम ४ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४ ला त्याचे पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात येईल ; आणि असा नवीन क्रमांक देण्यात आलेल्या पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :—

"(२) या कलमाच्या पोट-कलम (१) खालील सर्व शासकीय प्रयोजनांमध्ये पुढील शासकीय प्रयोजनांचा समावेश असेल :—

(अ) राज्य शासनाच्या सर्व कार्यालयांचा सर्व अंतर्गत व्यवहार किंवा कामकाज ;

(ब) राज्य शासनाच्या सर्व कार्यालयांद्वारे राज्यातील जनतेबरोबर करावयाचे सर्व संदेशवहन व पत्रव्यवहार ;

(क) सर्व टिप्पण्या, मसुदे आणि त्यावरील सर्व शेरे, अभिप्राय व मते आणि नियमपुस्तिका, कोणतीही प्रशासकीय कार्यवाही, उपविधि, सर्व प्रकारच्या सूचना, कोणतेही प्रशासकीय काम व कामकाज, योजना, कार्यक्रम, धोरणे, निर्णय, ठराव, प्रशासकीय व इतर अहवाल, प्रसिद्धीपत्रके, निमंत्रण पत्रिका, नाममुद्रित पत्रे किंवा राज्य शासनाच्या कोणत्याही कार्यालयाने पारित करावयाचे जनसंवाद व जनहित यांच्याशी संबंधित इतर कोणतेही आदेश व दस्तऐवज ;

(ड) राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांसमोर मांडण्यात यावयाचे सर्व प्रशासकीय व इतर अहवाल आणि शासकीय कागदपत्रे ;

(ई) राज्य शासनाने किंवा त्याच्या वतीने किंवा त्याच्या कोणत्याही विभागाने किंवा त्याच्या कार्यालयाने द्यावयाची किंवा निर्गमित करावयाची कोणतीही अनुज्ञप्ती, परवाना, प्रमाणपत्र, निविदा किंवा जाहिरात ;

(फ) राज्य शासनाच्या कार्यालयांमध्ये वापरण्यात यावयाचे सर्व प्रमाणित नमुने, प्रपत्रे किंवा नोंदवह्या किंवा जनसंवाद व जनहित यांच्याशी संबंधित असणारे इतर कोणतेही दस्तऐवज ;

(ग) राज्य शासनाच्या कार्यालयांतील सर्व संकेतफलक, नामफलक, सूचना फलक आणि जनसंवाद व जनहित यांच्याशी संबंधित असणाऱ्या इतर कोणत्याही प्रदर्शक बाबी ;

(ह) राज्य शासनाच्या कार्यालयांमध्ये वापरण्यात येणारे सर्व शिक्के व मोहोरा ;

(आय) राज्य शासनाच्या कोणत्याही कार्यालयाने आंतरजालामार्फत पुरवावयाचे इतर कोणतेही दस्तऐवज किंवा सेवा आणि संकेतस्थळ, उपयोजके, संकेतस्थळद्वार (पोर्टल) यांमार्फत व संदेशवहनाच्या अन्य कोणत्याही वीजकीय (इलेक्ट्रॉनिक) मार्गाने करावयाचे जनसंवाद व जनहित यांच्याशी संबंधित असणारे कोणतेही संदेशवहन ; आणि

(जे) विहित करण्यात येतील अशी इतर कोणतीही शासकीय प्रयोजने.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५ नंतर, पुढील कलमे समाविष्ट करण्यात येतील :— सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ यात नवीन कलमे ५अ, ५ब, ५क, ५ड, ५ई, ५फ, ५ग, ५ह व ५आय समाविष्ट करणे.

"**५अ.** या अधिनियमाच्या तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी, प्रत्येक मंत्रालयीन विभागाच्या दुय्यम आणि प्रशासकीय नियंत्रणाखालील कार्यालयांसह राज्य शासनाचे प्रत्येक कार्यालय, जनसंवाद व जनहित यांच्याशी संबंधित त्यांच्या धोरणांमध्ये मराठी भाषेचा वापर करण्यासाठी यथोचित तरतुदी करील. या अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी धोरणांमध्ये तरतुदी करणे.

**५ब.** (१) राज्य शासनाचे प्रत्येक कार्यालय, या अधिनियमान्वये त्याला नेमून दिलेली कार्ये पार पाडण्यासाठी, सुयोग्य अधिकाऱ्यास "मराठी भाषा अधिकारी" म्हणून पदनिर्देशित करील. मराठी भाषा अधिकारी पदनिर्देशित करणे.

(२) मराठी भाषा अधिकारी पुढील कार्ये पार पाडील :—

(अ) कार्यालयामध्ये शासकीय प्रयोजनांसाठी मराठीचा वापर करत नसल्यासंबंधीची व या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी होत नसल्यासंबंधीची गाऱ्हाणी किंवा तक्रारी स्वीकारणे व त्यांचे प्रभावी निवारण करण्यासाठी सहाय्य करणे ; आणि

(ब) या अधिनियमाच्या आणि त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींच्या प्रभावी अंमलबजावणीची सुनिश्चिती करण्यासाठी उपाययोजना करणे.

(३) कार्यालय प्रमुख आणि कार्यालयातील अन्य कोणताही अधिकारी व कर्मचारी, या अधिनियमान्वये मराठी भाषा अधिकाऱ्यास नेमून दिलेली कार्ये पार पाडण्यासाठी आवश्यक ते सहाय्य करतील.

**५क.** (१) या अधिनियमान्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करण्यासाठी व नेमून दिलेली कार्ये पार पाडण्यासाठी एक राज्य मराठी भाषा समिती असेल. राज्य मराठी भाषा समिती घटित करणे.

(२) राज्य मराठी भाषा समितीमध्ये, पुढील सदस्यांचा अंतर्भाव असेल :—

| | | |
|---|---|---|
| (एक) | मंत्री, मराठी भाषा | अध्यक्ष ; |
| (दोन) | राज्यमंत्री, मराठी भाषा | उपाध्यक्ष ; |
| (तीन) | मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन | उपाध्यक्ष ; |
| (चार) | अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग | सदस्य ; |
| (पाच) | सचिव, मराठी भाषा विभाग | सदस्य ; |
| (सहा) | सचिव, शालेय शिक्षण विभाग | सदस्य ; |
| (सात) | सचिव, नगर विकास विभाग | सदस्य ; |
| (आठ) | सचिव, महसूल विभाग | सदस्य ; |
| (नऊ) | उपसचिव, मराठी भाषा विभाग | सदस्य-सचिव. |

(३) राज्य मराठी भाषा समितीला, योग्य वाटेल अशा विविध क्षेत्रातील तज्ज्ञांना वेळोवेळी, बैठकीसाठी आमंत्रित करता येईल.

(४) राज्य मराठी भाषा समिती, वर्षातून किमान एकदा बैठक घेईल.

(५) राज्य मराठी भाषा समिती, पुढील अधिकारांचा वापर करील व पुढील कार्ये पार पाडील :—

(एक) या अधिनियमाच्या आणि त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्याची सुनिश्चिती करणे व त्याचा आढावा घेणे ;

(दोन) जिल्हा मराठी भाषा समितीने, या अधिनियमान्वये तिची कार्ये पार पाडताना, केलेल्या कारवाईबाबत सादर केलेल्या शिफारशींसह वार्षिक अहवालावर विचार करणे आणि या अधिनियमाच्या तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी तिला योग्य वाटतील असे निदेश जिल्हा मराठी भाषा समितीला देणे ;

(तीन) या अधिनियमाच्या आणि त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी, तिला योग्य वाटतील असे निदेश, राज्य शासनाच्या सर्व कार्यालयांना आणि जिल्हा मराठी भाषा समितीला देणे ;

(चार) या अधिनियमाच्या आणि त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक असतील अशी प्रोत्साहके, बक्षिसे किंवा योजना यांची शिफारस करणे.

जिल्हा मराठी भाषा समिती घटित करणे.

**५ड.** (१) प्रत्येक जिल्हाधिकारी, या अधिनियमान्वये त्याला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि नेमून देण्यात आलेली कार्ये पार पाडण्यासाठी जिल्ह्यात, एक जिल्हा मराठी भाषा समिती घटित करील.

(२) जिल्हा मराठी भाषा समितीमध्ये पुढील सदस्यांचा अंतर्भाव असेल :—

| | | |
|---|---|---|
| (एक) | जिल्हाधिकारी | अध्यक्ष ; |
| (दोन) | महानगरपालिका आयुक्त | सदस्य ; |
| (तीन) | पोलीस अधीक्षक | सदस्य ; |
| (चार) | मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद) | सदस्य ; |
| (पाच) | जिल्हा शिक्षणाधिकारी | सदस्य ; |
| (सहा) | मराठी भाषा, कला, प्रयोगनिष्ठ कला, साहित्य, संस्कृती किंवा प्रकाशने या क्षेत्रातील जिल्ह्यात राहणाऱ्या व्यक्तींमधून, जिल्हाधिकाऱ्याने नामनिर्देशित करावयाचे दोन प्रतिनिधी | सदस्य ; |
| (सात) | मराठी भाषा, कला, प्रयोगनिष्ठ कला, साहित्य, संस्कृती, प्रकाशने किंवा ग्रंथालये या क्षेत्रातील जिल्ह्यात काम करणाऱ्या अशासकीय संस्था, संघटना, चळवळी किवा मंच यांतील, जिल्हाधिकाऱ्याने नामनिर्देशित करावयाचे दोन प्रतिनिधी | सदस्य ; |
| (आठ) | जिल्हाधिकारी कार्यालयात पदनिर्देशित केलेला मराठी भाषा अधिकारी | सदस्य-सचिव. |

(३) वरील खंड (सहा) व (सात) मध्ये निर्दिष्ट केलेले अशासकीय सदस्य, जिल्हाधिकारी आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील अशा कालावधीसाठी पद धारण करतील.

(४) जिल्हा मराठी भाषा समिती, तीन महिन्यातून किमान एकदा बैठक घेईल.

**५ई.** (१) जिल्हा मराठी भाषा समिती, पुढील अधिकारांचा वापर करील आणि पुढील कार्ये पार पाडील :— जिल्हा मराठी भाषा समितीचे अधिकार व कार्ये.

(अ) या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जिल्ह्यातील राज्य शासनाच्या सर्व कार्यालयांना निदेश देणे ;

(ब) शासकीय प्रयोजनांसाठी, किंवा या अधिनियमाच्या आणि त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींच्या अंमलबजावणीसाठी मराठीचा वापर होत नसल्यासंबंधीच्या गाऱ्हाण्यांची किंवा तक्रारींची चौकशी करणे व त्याचे निवारण करणे ;

(क) जिल्ह्यातील राज्य शासनाच्या सर्व कार्यालयांमधून या अधिनियमाखालील तक्रारींशी किंवा गाऱ्हाण्यांशी संबंधित आवश्यक माहिती, अभिलेख व अहवाल मागविणे व प्राप्त करणे ;

(ड) या अधिनियमाच्या अंमलबजावणीसंबंधीच्या तक्रारींची किंवा गाऱ्हाण्यांची चौकशी करणे व त्यांचे निवारण करणे आणि त्या शीघ्रगतीने निकालात काढणे ;

(ई) या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन झाल्याचे दिसून आले तर, या अधिनियमाच्या तरतुदींचे अनुपालन करण्यासाठी राज्य शासनाच्या संबंधित कार्यालयास निदेश देणे ;

(फ) या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्याच्या संबंधात, राज्य शासन, वेळोवेळी निदेश देईल अशा विविध कार्यक्रमांचे, प्रकल्पांचे, उपक्रमांचे, कार्यशाळांचे, प्रदर्शनांचे किंवा चर्चासत्रांचे आयोजन करणे ;

(ग) या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्याच्या संबंधात, या अधिनियमाअन्वये तिची कार्ये पार पाडताना, तिने केलेल्या कारवाईबाबतचा वार्षिक अहवाल, शिफारशींसह, राज्य मराठी भाषा समितीला सादर करणे ;

(ह) विहित करण्यात येतील अशा इतर अधिकारांचा वापर करणे आणि अशी इतर कार्ये पार पाडणे.

(२) राज्य शासनाची कार्यालये, जिल्हा मराठी भाषा समितीच्या निदेशांचे, ते प्राप्त झाल्यापासून पंधरा दिवसांच्या कालावधीच्या आत, अनुपालन करतील व जिल्हा मराठी भाषा समितीला अनुपालन अहवाल पाठवतील.

**५फ.** राज्य शासनाचे प्रत्येक कार्यालय, या अधिनियमाखालील आणि त्याखाली केलेल्या नियमांखालील वर्जित प्रयोजनांव्यतिरिक्त, सर्व शासकीय प्रयोजनांमध्ये मराठी भाषेचा वापर केला जात आहे असे, त्याच्या संकेतस्थळावर किंवा इतर कोणत्याही वीजकीय (इलेक्ट्रॉनिक) साधनावर किंवा जनतेला सहज साध्य होईल अशा संदेशवहनाच्या इतर कोणत्याही साधनावर, स्वयंप्रेरणेने प्रसिद्ध करील. मराठी भाषेच्या वापराबाबत स्वयंप्रेरणेने प्रकटीकरण.

**५ग.** राज्य शासनाच्या विभागाचा प्रशासकीय प्रमुख किंवा विभाग प्रमुख किंवा कार्यालयाचा कार्यालय प्रमुख किंवा कार्यालयाचा नियंत्रण अधिकारी,— अंमलबजावणी व अनुपालन करण्याची जबाबदारी.

(अ) या अधिनियमाच्या आणि त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी ;

(ब) जिल्हा मराठी भाषा समितीने, राज्य मराठी भाषा समितीने व राज्य शासनाने, वेळोवेळी दिलेल्या सर्व निदेशांच्या व अनुदेशांच्या अनुपालनासाठी ;

(क) या अधिनियमाच्या आणि त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी, सर्व आवश्यक सुविधा व सेवा पुरविण्यासाठी,

जबाबदार असेल.

निदेश देण्याचा शासनाचा अधिकार.

**५ह.** राज्य शासनास, या अधिनियमाच्या आणि त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी, आवश्यक असतील असे निदेश किंवा अनुदेश, राज्य शासनाच्या सर्व कार्यालयांना देता येतील.

शिक्षा.

**५आय.** शिस्तभंगविषयक प्राधिकारी, या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करत नसल्याबाबतची तक्रार किंवा गाऱ्हाणे प्राप्त झाल्यावर, आवश्यक असल्याचे दिसून आल्यास, महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ याअन्वये किंवा त्याला लागू असलेल्या अन्य कोणत्याही सेवा नियमांन्वये किंवा विनियमांन्वये संबंधित शासकीय कर्मचाऱ्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करील. शिस्तभंगविषयक प्राधिकारी, त्याने केलेल्या अशा शिस्तभंगाच्या कारवाईसंबंधातील अहवाल राज्य मराठी भाषा समितीला व जिल्हा मराठी भाषा समितीला सादर करील.".

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

RNI No. MAHENG /2009/35528

# महाराष्ट्र शासन राजपत्र
## असाधारण भाग आठ

वर्ष ७, अंक १३(६)] शुक्रवार, जुलै १६, २०२१/आषाढ २५, शके १९४३ [पृष्ठे ६, किंमत : रुपये २७.००

असाधारण क्रमांक ३३

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).**

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Official Languages (Amendment) Act, 2021 (Maharashtra Act No. XIV of 2021), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SATISH WAGHOLE,
I/C. Secretary (Legislation) to Government,
Law and Judiciary Department.

---

## MAHARASHTRA ACT No. XIV OF 2021.

(*First published, after having received the assent of the Governor in the "Maharashtra Government Gazette", on the 16th July 2021*).

An Act further to amend the Maharashtra Official Languages Act, 1964.

Mah. V of 1965. **WHEREAS** it is expedient further to amend the Maharashtra Official Languages Act, 1964, for the purposes hereinafter appearing; it is hereby enacted in the Seventy-second Year of the Republic of India, as follows :-

Short title. **1**. This Act may be called the Maharashtra Official Languages (Amendment) Act, 2021.

Amendment of section 2 of Mah. V of 1965.

**2.** In section 2 of the Maharashtra Official Languages Act,1964 (hereinafter referred to as "the principal Act"),- Mah. V of 1965.

*(a)* after clause *(b),* the following clause shall be inserted, namely :—

"*(b-1)* "District Marathi Language Committee" means a District Marathi Language Committee constituted in each district under section 5D;";

*(b)* after clause *(c),* the following clauses shall be added, namely :—

"*(d)* "Marathi Language Officer" means an officer designated as the Marathi Language Officer under sub-section *(1)* of section 5B;

*(e)* "prescribed" means prescribed by rules ;

*(f)* "State Government" means the Government of Maharashtra ;

*(g)* "State Marathi Language Committee" means the State Marathi Language Committee constituted under section 5C.".

Amendment of section 4 of Mah. V of 1965.

**3**. Section 4 of the principal Act shall be renumbered as sub-section *(1)* thereof; and after sub-section *(1),* as so renumbered, the following sub-section shall be added, namely :—

"*(2)* All official purposes under sub-section *(1)* includes the following namely :—

*(a)* all internal affairs or business of all offices of the State Government;

*(b)* all communication and correspondence to be made with the public in the State by all offices of the State Government;

*(c)* all noting, drafting, all remarks, comments and opinions thereon, manuals, any administrative proceedings, bye-laws, all types of notices, any administrative work and business, schemes, programs, policies, decisions, resolutions, administrative and other reports, press releases, invitation cards, letter-heads or any other orders or documents pertaining to public interface and public interest to be issued by any office of the State Government;

*(d)* all administrative and other reports and official papers to be laid before the both Houses of the State Legislature;

*(e)* any license, permit, certificate, tender or advertisement to be given or issued by or on behalf of the State Government or any Department or office thereof;

*(f)* all standard forms, proformas or registers to be used or any other documents pertaining to public interface and public interest in offices of the State Government;

*(g)* all sign boards, name plates, notice boards and any other display matters pertaining to public interface and public interest in offices of the State Government;

*(h)* all stamps or seals to be used in offices of the State Government;

*(i)* any other documents or services to be provided through internet and any communication pertaining to the public interface and public interest to be made through the website, apps, portals, and any other electronic mode of communication by any office of the State Government; and

*(j)* any other such official purposes as may be prescribed.".

4. After section 5 of the principal Act, the following sections shall be inserted, namely :— Insertion of new sections 5A, 5B, 5C, 5D, 5E, 5F, 5G, 5H and 5I in Mah. V of 1965.

"**5A**. Every office of the State Government, including offices subordinate and under administrative control of each Department of Mantralaya, shall make suitable provisions in its policies pertaining to public interface and public interest for use of Marathi for effective implementation of the provisions of this Act. Provisions in policy for effective implementation of this Act.

**5B**. *(1)* Every office of the State Government shall designate a suitable officer as 'Marathi Language Officer' to discharge the functions assigned to him under this Act. Designation of Marathi Language Officer.

*(2)* The Marathi Language Officer shall discharge the following functions, namely :—

*(a)* receive the grievances or complaints pertaining to non-use of Marathi in official purposes and implementation of the provisions of this Act in the office and to facilitate for its effective redressal; and

*(b)* to take steps to ensure the effective implementation of the provisions of this Act and the rules made thereunder.

*(3)* The Head of the Office and any other officer and employees in the office shall render necessary assistance to the Marathi Language Officer for discharging the functions assigned to him under this Act.

**5C.** *(1)* There shall be a State Marathi Language Committee to exercise the powers conferred on and to discharge the functions assigned to it under this Act. Constitution of State Marathi Language Committee.

*(2)* The State Marathi Language Committee shall consist of the following members, namely :—

| | | |
|---|---|---|
| *(i)* | Minister, Marathi Language | Chairperson; |
| *(ii)* | State Minister, Marathi Language | Vice-Chairperson; |
| *(iii)* | Chief Secretary, Government of Maharashtra | Vice-Chairperson; |
| *(iv)* | Additional Chief Secretary (Services), General Administration Department | Member; |
| *(v)* | Secretary, Marathi Language Department | Member; |

| | | |
|---|---|---|
| *(vi)* | Secretary, School Education Department | Member; |
| *(vii)* | Secretary, Urban Development Department | Member; |
| *(viii)* | Secretary, Revenue Department | Member; |
| *(ix)* | Deputy Secretary, Marathi Language Department | Member-Secretary. |

*(3)* The State Marathi Language Committee may invite experts from various fields, as it may deems fit, from time to time, for the meeting.

*(4)* The State Marathi Language Committee shall meet at least once in a year.

*(5)* The State Marathi Language Committee shall exercise the following powers and discharge the following functions, namely :—

*(i)* ensure and review the implementation of the provisions of this Act and the rules made thereunder;

*(ii)* consider an annual report alongwith recommendations submitted by the District Marathi Language Committee about action taken by it in discharge of its functions under this Act and to give directions to the District Marathi Language committee as it deems fit for effective implementation of the provisions of this Act;

*(iii)* give directions to all offices of the State Government and the District Marathi Language Committee as it deems fit for effective implementation of the provisions of this Act and the rules made thereunder;

*(iv)* recommend such incentives, rewards or schemes as may be necessary for effective implementation of the provisions of this Act and the rules made thereunder.

Constitution of District Marathi Language Committee.

**5D.** *(1)* The District Collector of each district shall constitute a District Marathi Language Committee in the District to exercise the powers conferred on and to discharge the functions assigned to it under this Act.

*(2)* The District Marathi Language Committee shall consist of the following members, namely :—

| | | |
|---|---|---|
| *(i)* | District Collector | Chairperson; |
| *(ii)* | Municipal Commissioner | Member; |
| *(iii)* | Superintendent of Police | Member; |
| *(iv)* | Chief Executive Officer (Zilla Parishad) | Member; |
| *(v)* | District Education Officer | Member; |
| *(vi)* | Two representatives amongst the persons residing in the district from the field of the Marathi language, arts, performing arts, literature, culture or publications to be nominated by the District Collector | Member; |

| | | |
|---|---|---|
| *(vii)* | Two representatives of the non-Government institutions, organizations, movements or forums working in the district in the field of the Marathi language, arts, performing arts, literature, culture, publications or libraries to be nominated by the District Collector | Member; |
| *(viii)* | Marathi Language Officer designated in the office of the District Collector | Member-Secretary. |

*(3)* The non-official members referred to in clauses *(vi)* and *(vii)* above shall hold the office for such period as the District Collector may, by an order, specify.

*(4)* The District Marathi Language Committee shall meet at least once within three months.

Powers and functions of District Marathi Language Committee.

**5E.** *(1)* The District Marathi Language Committee shall exercise the following powers and discharge the following functions, namely :—

*(a)* give directions to all offices of the State Government in the District for effective implementation of the provisions of this Act and the rules made thereunder;

*(b)* enquire into and redress the grievances or complaints pertaining to non-use of Marathi for official purposes and implementation of the provisions of this Act and the rules made thereunder;

*(c)* call and receive the necessary information, records and reports pertaining to complaints or grievances under this Act from all offices of the State Government in the District;

*(d)* enquire into and resolve the complaints or grievances regarding implementation of this Act and dispose them in an expeditious manner;

*(e)* direct the concerned office of the State Government to comply with the provisions of this Act, if found violating any of the provisions of this Act;

*(f)* organize various programs, projects, activities, workshops, exhibitions and seminars as may be directed by the State Government, time to time, with regard to the implementation of the provisions of this Act;

*(g)* submit an annual report to the State Marathi Language Committee about action taken by it in discharge of its functions under this Act alongwith its recommendations with regard to the effective implementation of the provisions of this Act;

*(h)* exercise such other powers and perform such other functions as may be prescribed.

*(2)* The offices of the State Government shall comply with the directions of the District Marathi Language Committee within a period of fifteen days from the receipt thereof and forward a compliance report to the District Marathi Language Committee.

Proactive disclosure about use of Marathi.

**5F.** Each office of the State Government shall proactively publish on its website or any other electronic mode or any other mode of communication which are easily accessible to the public that Marathi is being used in all official purposes, other than excepted purposes under this Act and rules made thereunder.

Responsibility of implementation and compliance.

**5G.** The administrative Head or Head of the Department or Head of the office or Controlling Officer of the office of the State Government shall be responsible for,—

*(a)* effective implementation of the provisions of this Act and the rules made thereunder;

*(b)* compliance of all directions and instructions issued by the District Marathi Language Committee, the State Marathi Language Committee and the State Government, from time to time;

*(c)* providing all necessary facilities and services for effective implementation of the provisions of this Act and the rules made thereunder.

Power of Government to give directions.

**5H.** The State Government may issue such directions or instructions to all offices of the State Government as may be necessary for effective implementation of the provisions of this Act and the rules made thereunder.

Punishment.

**5I.** The Disciplinary Authority shall on receipt of complaint or grievance regarding non-implementation of the provisions of this Act, initiate disciplinary action against the concerned Government servant under the Maharashtra Civil Services (Discipline and Appeal) Rules, 1979 or any other service rules or regulations as applicable to him, if found necessary. The Disciplinary Authority shall submit a report regarding such disciplinary action taken by it to the State Marathi Language Committee and District Marathi Language Committee.".

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.